भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ८४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०३/०२/२०१७

**१) अल्पवयीन मुलीची लैंगीक फसवणुक केल्याने व झालेली घटना कोणालाही न सांगाण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १५/०६/२०१७ चे १२.३० ते ०२/०२/२०१७ चे १८.०० वा. दरम्यान. यातील पिडीत मुलगी ही अल्पवयीन असुन सुध्दा आरोपी हा त्याच गावचा राहणारा आहे. आरोपीने पिडीताचा पाठलाग करून तीची लैंगीक फसवणुक केल्याने व झालेली घटना कोणाला न सांगण्यासाठी धमकी दिल्याने पिडीत पिडीत फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे अप क्र. २०/१७कलम ३५४,(ड),५०६ कलम भादवी सहकलम १२ पोक्सो ॲक्ट नुसार पोलीस स्टेशन वरठी ला गुन्हा नोंद करण्यात आला पुढील तपास पोउपनी. कारंडे पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**२) अल्पवयीन मुलगी घरुन निघुन गेल्याने गुन्हा नोंद. : —**

दिनांक ३०/०१/२०१७ चे १७.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी ही आपले पती सोबत घराबाहेर गेली असतांना यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी हीने तीचे सर्व कपडे व शाळेचे कागदपत्र व फोटो घेवुन घरुन निघुन गेली फिर्यादीची मुलगी हि अल्पवयीन असल्याने तिला कोणीतरी अज्ञात आरोपीने अपहरण केले असावे असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३६३ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि.चाबुकस्वार पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) अवैध दारू /जुगार अडयांवर धाडी . :—**

दिनांक ०३/०२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. जवाहरनगर, मोहाडी, साकोली,, लाखनी, पवनी व लाखांदुर येथील अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०९ गुन्हे दाखल करून आरोपीच्या ताब्यातुन ३९ हातभट्टी दारु किंमती ३,१३०/—रु. व ४०लिटर ५० मीली लीटर देशी/विदेशी दारु किंमती १४,२३०/—रू चा माल जप्त करण्यात आला आहे.

**३) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक ०३/०२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ८२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी वाहतुक ५ केसेस ,तीन सिटर वाहनांवरती २० केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ५७ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.